# शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका
# शिवाजी नगर, पुणे ४११००५
# फर्निचर दुरूस्ती करणेकामी निविदा अटी व शर्ती २००९–१०.

१.पुणे दैनिक प्रभात व दैनिक लोकसत्ता दि. १६/०२/२०१० व १७/०२/२०१० मधील प्रसिध्द झालेल्या जाहीर निविदा क्रं. २५/ भांडार सुचनेस अनुसरून फर्निचर दुरूस्ती करणेकामी विहीत नमुन्यातील निविदा फॉर्म व निविदा खालीलप्रमाणे.

**शिक्षण मंडळ पुणे म.न.पा., पुणे व त्यांनी नियुक्त व अधिकृत केलेल्या खरेदी समितीने** आर्थिक वर्ष २००९–१० चे करिता फर्निचर दुरूस्ती विशिष्ठ मुदतीत करणेसाठी निविदा अटी व शर्ती व स्पेसिफिकेशन खालील प्रमाणे.

**२. अटी व शर्ती :–**

१.निवीदा सीलबंद असली पाहिजे. दिलेल्या मुदतीत व वेळेत निवीदा आली नाही तर ती स्विकारली जाणार नाही.

२.निविदेसाठी दोन लिफाफा पध्द्त असुन अ पाकीटमध्ये खालील साक्षांकित कागदपत्रे सादर करावयाची आहेत.

**३.अ.पाकीटात सादर करावयाची कागदपत्रे.**

१) निवीदा रकमेच्या शेकडा १% या दराने बयाणा रक्कम म्हणून राष्ट्रीयकृत बॅंकेचा मा.शिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे म.न.पा, पुणे यांचे नावे काढलेल्या धनाकर्ष (DD)कार्यालयात चलनाने भरणा करावा २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयानुसार परिशिष्ट १२ अन्वये संबंधित लघुउद्योगाकडे अधिकृत पुरवठादार असल्याचे विकास आयुक्त, उद्योग व भांडार यांचे अधिकृत नोंदणी असल्याबाबतचे चालू वर्षाचे पत्र सोबत जोडले तरच निवीदादारास बयाणा रक्कम व अनामत रकमेमध्ये सुट मिळेल अन्यथा त्याला एस.एस.आय.युनिट असेल तरीसुध्दा वरील रकमा भराव्या लागतील.

२) निवीदादाराचे संस्था नोंदणी केलेले अद्ययावत प्रमाणपत्र.

३)शासनाकडिल फर्निचर दुरूस्त केल्याबाबतचा ३ लाख पर्यंतचा अनुभव असणे आवश्यक आहे.

४)निविदादाराची निविदा कामाची पूर्तता करण्या संबंधीची आर्थिक क्षमता असल्याबाबतचे बॅंकेचे प्रमाणपत्र निविदेच्या एकूण किमतीच्या किमान २५% रकमेचे

५)कागदपत्रांच्या पाकीटात सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती पाकीट उघडताना शिक्षण मंडळ कार्यालयास तपासणीचे कामी सादर करावी लागतील.

६)पाकीट ब मध्ये निविदा धारकाने मध्ये बाब निहाय सर्व करासह दर भरावेत व दोनही पाकीटे सिलबंद करून एका मोठया पाकीटात भरून त्या पाकीटावर निवीदा धारकाचे नाव, निवीदा क्रं.नमुद करून तो सिलबंद करून सादर करावा.

७)पाकीटामध्ये आवश्यक ती कागदपत्रे नसल्यास याबाबत खरेदी समितीचा निर्णय अतिंम राहील.

**८.निवीदादाराने पुर्तता करावयाच्या अटी व शर्ती.**

१.निविदा स्वच्छ व स्पष्ट अक्षरात लिहिलेली असावी. फर्निचर दुरूस्तीचे दर अंकी व अक्षरी असावीत. .

२.निवीदा स्विकारण्याचा, नाकारण्याचा पुर्ण अगर अशंत: मंजुर करण्याचा सर्वस्वी अधिकार खरेदी समितीस आहे.

३.निविदाकरिता मंजूर व जाहीर केलेल्या रकमेत संख्येत बदल करण्याचा अधिकार खरेदी समितीस आहे.

४.मान्य निवीदा धारकास निविदा दर स्विकृती मिळाल्यापासुन ७ दिवसाच्या आत शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या नियमानुसार सर्वसाधारण मुद्राकावर करार करणे बंधनकारक आहे.करार करण्यास निविदादाराने असमर्थता दर्शविल्यास बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल. प्रसंगी शिक्षण मंडळास सदर प्रक्रियेतुन काही नुकसान झाले असल्यास तीही रक्कम संबधितांकडून वसूल करण्यात येईल.

५.मान्य निवीदादारास करार करतेवेळी फर्निचर दुरूस्ती करणेच्या एकूण किंमतीच्या ५ % रक्कम सुरक्षा/अनामत रक्कम म्हणून शिक्षण मंडळाकडे धनाकर्ष (DD) ने भरावी लागेल.

६.निवीदेतील मान्य दर फक्त आर्थिक वर्ष २००९—१० करिताच करार केल्यापासून बंधन कारक राहतील.

७.बयाणा रक्कम व अनामत रक्कम पूर्णपणे एकमेकांपासून वेगळया आहेत. सदर रकमांवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

८. फर्निचर दुरूस्ती करीता करारनाम्यात दिलेली मुदत कोणत्याही परिस्थितीत वाढवून मिळणार नाही. सदर मुदत करारनाम्याची विशेष व महत्वाची अट राहिल. मात्र विशेष परिस्थितीत दिलेली मुदत वाढविण्याचा अधिकार मा. खरेदी समितीस राहिल.

९. दिलेल्या मुदतीत स्पेसिफिकेशन प्रमाणे फर्निचर दुरूस्ती न केल्यास निविदादराची अनामत रक्कम जप्त केली जाईल. प्रसंगी निवीदादारास ब्लॅकलिस्ट करण्याचा अधिकार मा. खरेदी समितीस आहे व राहिल. वेळी व प्रसंगी नुकसान भरपाई मागणीचा अर्ज संबधित ठेकेदाराविरूध्द् लवादाकडे सादर केला जाईल व त्याच्या खर्चास व परिणामास संबंधितास जबाबदार धरले जाईल.

१०. शाळांमधील दुरूस्त केलेले सर्व फर्निचर मोजून, तपासून घेवून दिलेल्या नमुन्या प्रमाणे सर्व फर्निचर दुरूस्त केले असल्याची खात्री मा.खरेदी समितीस झाल्याशिवाय बिल मिळणार नाही.कोणत्याही स्वरूपात हप्त्याचे आगाऊ बिल मिळणार नाही. कोणासही ॲडव्हान्स रक्कमेची मागणी करता येणार नाही तसेच देय बिलातून आयकर कलम १९४ सी नुसार टीडीएसच्या रकमेची कपात केली जाईल.

११.एकदा भरलेली निवीदा रदद् करता येणार नाही एखादयाला ती जर रदद् करावयाची असेल तर त्याची संपूर्ण बयाणा रक्कम जप्त करण्याचा अधिकार खरेदी समितीस राहिल तसेच सदरची निविदा दुसऱ्या ठेकेदारास दिल्यानंतर बिलातील येणारा जादा फरक दंड म्हणून वसूल करण्यात येईल.

१२. मा.शिक्षण मंडळाने निविदेमध्ये नमुद केलेले फर्निचर दुरूस्तीचे काम मंजुर निविदादारास दिल्यानंतर इतर निविदादारांची बयाणा रक्कम चेकने परत दिली जाईल. त्यापूर्वी कोणासही बयाणा रक्कम दिली जाणार नाही. बयाणा रक्कम मागणी अर्जासोबत मूळ पावती जोडणे आवश्यक आहे.

१३. निविदादाराने फर्निचर दुरूस्ती झालेली आहे त्या संबधी पाहणी व तपासणी करण्याची विनंती खरेदी समितीस केली पाहिजे व तसे विनंती पत्र देणे आवश्यक आहे.

१४. फर्निचर दुरूस्ती बाबत काही वाद निर्माण झाल्यास तो करारनाम्यानुसार लवादाचा विषय असेल व उभय पक्षाला संबधित वाद निर्णयाकरिता लवादाकडेच पाठवावा लागेल.

१५ फर्निचर दुरूस्तीची निविदा एकास/अनेकास देणे किंवा विभागून देण्याचा अधिकार खरेदी समितीस आहे.

१६. फर्निचर दुरूस्ती झाल्यानंतर त्याची खरेदी समितीकडून पाहणी करण्यात येईल. दिलेला फर्निचर दुरूस्ती विहित नमुन्यात आहेत किंवा नाही हे पाहिले जाईल खराब किंवा स्पेसिफिकेशन प्रमाणे नसलेला फर्निचर दुरूस्ती कोणत्याही परिस्थितीत स्विकारला जाणार नाही.

१७. फर्निचर दुरूस्ती ठरवून दिलेल्या मुदतीत केल्यानंतर दुरूस्त केलेल्या फर्निचर दुरूस्तीची एकत्रित देयक मा.शिक्षण प्रमुख शिक्षण मंडळ पुणे म.न.पा.पुणे यांच्या नावे या कार्यालयात सादर करावे लागेल. शाळावार फर्निचर दुरूस्ती केलेली चलन्स संबधित शाळेच्या मा.मुख्याध्यापकाच्या स्वाक्षरी व शिक्यासह देयकासमवेत सादर करावी लागतील त्याशिवाय कोणत्याही परिस्थितीत बिल देण्याबाबत कार्यवाही केली जाणार नाही.

१८. निविदा दिनांक २६/२/२०१० रोजी दुपारी ३ वाजता उघडण्यात येतील.वेळी व त्याप्रसंगी ठेकेदार स्वत: किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहू शकतील. प्रशासकीय कारणास्तव त्या दिवशी निविदा न उघडलयास निविदा उघडण्याचा नवीन दिनांक सहभागी निविदादारास दूरध्वनी वरुन कळविण्यात येईल. वेळी व त्याप्रसंगी निविदादारास हजर रहावे लागेल त्याकामी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

पुणे.

दिनांकः—

| | |
|---|---|
| **अध्यक्ष** | **शिक्षण प्रमुख,** |
| **शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा.** | **शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा.** |

---

## प्रतिज्ञालेख

मी,श्री.—————————————————————वय———वर्ष

व्यवसाय—धंदा,राहणार——————————————————————————

निविदादार सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,वरील निवीदेच्या,फॉर्म सोबतच्या अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचल्या असून त्या सर्व मला व माझ्या संस्थेला मान्य आहेत. त्यानुसारच निवीदा भरलेली आहे व निवीदासोबत मला अटी व शर्ती मान्य आहेत. म्हणून सदर प्रतिज्ञापत्रावर आज रोजी पुणे येथे सही करुन निवीदेसोबत दाखल करित आहे.

**पुणेः—**

**दिनांकः—**

**पुरवठा धारकाची सही व शिक्का**

# शिक्षण मंडळ पुणे महानगरपलिका
## स्पेसिफिकेशन २००९—१०
## निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक २६/०२/२०१०
## वेळ — दुपारी ०१.०० वाजेपर्यंत
## बयाण रक्कम रूपये — ५०००/—
## फर्निचर दुरूस्ती

| अ.क्र. | तपशील |
|---|---|
| १ | डयुएल डेक्स दुरूस्ती -तुटलेल्या फळया काढणे, उपलब्ध जुन्या फळया मापाप्रमाणे कट करून बसविणे, पॉलीश करणे, दुरूस्ततीचादर आवश्यकतेनुसार लोखंडी सांगाडयाला वेल्डिंग करून लोखंडी सांगाडयाला काळा पेंट मारणे, स्क्रू, खिळे, पेंटींग,मजुरी इ.सहित प्रत्येक नग दुरूस्तीचा दर |
| २ | डयुएल डेक्स दुरूस्ती ड्ढ तुटलेल्या फळया काढणे ,नवीन १९.एम.एम.प्लाय आय.एस. ट्रेड मार्क व लिपींग पट्टी सहीत मापाप्रमाणे कापून बसविणे व वेल्डींग करणे,पॉलीश करणे,लोखंडी सांगाडयाला काळा पेंट मारणे ,स्क्रू,खिळे,पेटींग,मजूरी इव्सहीत प्रत्येक नग |
| अ | १५ इंच X ३ फूट टॉप (सर्व कामासहित) |
| ब | १२ इंच X ३ फूट बॉटम (सर्व कामासहित) |
| क | ९ इंच X ३ फूट कप्पा (सर्व कामासहित)<br>५ इंच X ३ फूट कप्पा (सर्व कामासहित |
| | एकूण |
| ३ | लोखंडी व लाकडी खुर्च्या दुरूस्ती -तुटलेले सीट काढणे,उपलब्ध जुन्या फळया मापाप्रमाणे कट करून बसविणे, पॉलीशकरणे, लोखंडी सांगाडयाला काळा पेंट मारणे, स्क्रू, खिळे, पेंटींग,मजुरी इ.सहित प्रत्येक नग दुरूस्तीचा दर |
| ४ | लोखंडी व लाकडी खुर्च्या दुरूस्ती तुटलेले सीट/बॅक काढणे,नवीन १९ एम.एम.प्लाय आय.एस. ट्रेड मार्क व लिपींग पट्टी सहीत मापाप्रमाणे कापून बसविणे व वेल्डींग करणे,पॉलीश करणे,लोखंडी सांगाडयाला काळा पेंट मारणे, स्क्रू,खिळे,पेटींग,मजूरी इ० सहीत प्रत्येक नग दुरूस्तीचा दर |
| अ | १.५ इंच X २ फूट बॅक (सर्व कामासहित |
| ब | २ इंच X २ फूट बॉटम((सर्व कामासहित |
| | एकूण |
| ५ | लोखंडी व लाकडी टेबल दुरूस्ती करणे,-तुटलेल्या फळया काढणे, उपलब्ध जुन्या फळया मापाप्रमाणे कट करून बसविणे, ड्रॉवर दुरूस्ती पॉलीश करणे, लोखंडी सांगाडयाला काळा पेंट मारणे, स्क्रू, खिळे, पेंटींग,मजुरी इ.सहित प्रत्येक नग दुरूस्तीचा दर |
| ६ | लोखंडी व लाकडी टेबल दुरूस्ती तुटलेले सीट/बॅक काढणे,नवीन १९ एम.एम.प्लाय आय.एस. ट्रेड मार्क व लिपींग पट्टी सहीत मापाप्रमाणे कापून बसविणे व वेल्डींग करणे,पॉलीश करणे,लोखंडी सांगाडयाला काळा पेंट मारणे ,स्क्रू,खिळे,पेटींग,मजूरी इव्सहीत प्रत्येक नग दुरूस्ततीचादर |
| अ | ४ इंच X २ फूट टॉप (सर्व कामासहित |
| ७ | लाकडी कपाटे दुरूस्त करणे -तुटलेल्या फळया काढणे, उपलब्ध जुन्या फळया मापाप्रमाणे कट करून बसविणे, पॉलीश करणे, स्क्रू,खिळे,पेंटींग,<br>मजुरी इ.सहित प्रत्येक नग दुरूस्तीचा दर |

अध्यक्ष,
शिक्षण मंडळ पुणे मनपा

शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ पुणे मनपा